या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर



प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार १२ जून २०२४ | अंक१८५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# जरांगे पाटलांची प्रकृती बिघडली, दिवसभरात दुसऱ्यांदा डॉक्टरांचे पथक, शासनाला कळवला हा निर्णय

## शरद पवार यांना साकडे

मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरु आहे. परंतु शासनाकडून दखल घेतली गेली नाही. यामुळे नाशिकमध्ये शरद पवार यांना साकडे घालण्यात आले. मराठा आरक्षणासाठी शरद पवार यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नाशिकमधील सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. अंतरवली सराटी येथे सुरू असलेल्या मनोज जारंगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये सकल मराठा समाजाची बैठक झाली. त्यात शरद पवार यांना लक्ष देण्याची मागणी करण्यात आली.

### मनोज जरांगे पाटील उपचार घेत नसल्याचे प्रशासनाने सरकारला लेखी कळवले



मराठा आरक्षणासाठी लढणारे मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली. उपोषणाच्या चौथ्या दिवशी त्यांना त्रास सुरु झाला. जरांगे पाटील यांचा रक्तदाब (बीपी) आणि मधुमेह (शुगर) कमी झाला आहे. त्यामुळे त्यांना उपचार सुरु करण्यासाठी डॉक्टरांचे पथक मंगळवारी दुसऱ्यांदा पुन्हा अंतरवाली सराटी येथे दाखल झाला आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर राजेंद्र पाटील यांच्यासह अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके पोहचले होते. तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर राजेंद्र पाटील या दोघांनीही जरांगे यांच्याकडे उपचार घेण्याची विनंती केली. मात्र ही विनंती जरांगे पाटलांनी धुडकावून लावली. प्रशासनाने शासनाला कळवला मनोज जरांगे यांचा निर्णयमनोज जरांगे पाटील उपचार घेत नसल्याचे प्रशासनाने सरकारला लेखी कळवले आहे. तसेच राज्य शासनाच्या शिष्टमंडळाबाबत अजून कोणताही निरोप नाही, असेही तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी म्हटले. जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या आज चौथा त्यांना भेटण्याठी आज ख्रिश्चन धर्मगुरू आले. अंतरवाली सराटी येथील उपोषणस्थळी येत जरांगे पाटील यांच्या तब्येतीची विचारपूस केली. सर्व आमदार खासदारांनी एकत्रित अंतरवली सराटी येथे जाऊन जरांगे पाटील यांचे आंदोलन स्थगित करण्यासाठी प्रयत्न करावे त्यांना हमी द्यावीजर हे नेते आंतरवाली सराटी येथे गेले नाही तर पहिलं आंदोलन शरद पवार यांच्या घरापासून सर्वप्रमुख राजकीय नेत्यांच्या घरासमोर केले जाईल

## कृषी कन्यांनी शेतकऱ्यांना दिली बिजांकुरण प्रात्याक्षिकाची माहिती

**प्रतिनिधी/नवगण राजुरी**

सौ.के.एस.के.(काकू)कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी बिजांकडून या विषयावर प्रात्याक्षीकाद्वारे शेतकऱ्यांना माहिती दिली. योग्य नियोजना अभावी दरवर्षी शेतकऱ्यांना बियाणे न उगवल्यामुळे दुबार पेरणीची वेळ येते त्यामुळे या प्रात्यक्षिकामुळे बियाण्याची उगवण्याची क्षमता पेरणीपूर्वीच चाचणी करून घेणे गरजेचे आहे. विद्यार्थिनींनी शेतकऱ्यांना बिजांकुरण प्रदर्शनाबद्दल सविस्तर माहिती दिली. सोयाबीन या पिकाचे प्रात्यक्षिक करून दाखविले.



यावेळी कृषी कन्या खोड प्रतीक्षा, गवळी संध्या, पवार ज्योती, करांडे रूपाली, पाटील यशस्वी, खोले निकिता उपस्थित होत्या. ग्रामीण जागरूकता कार्यक्रम कार्यानुभव कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अनंत कृषी विकास प्रतिष्ठानचे सहसचिव डॉ.जी.व्ही. साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभत आहे तसेच प्राचार्य एस.पी. मोरे, प्रा.व्ही.जी. तायडे, एस.एस. राठोड, पी.ए. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

## खा. बजरंग सोनवणेंकडून जनसामान्यांच्या अडचणी जाणून घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात

### पवनसुत निवासस्थानी नागरिकांनी केली गर्दी

**प्रतिनिधी/केज :-**

आठवडाभरानंतर खासदार बजरंग सोनवणे हे जिल्ह्यात दाखल होताच त्यांच्या केज येथील पवनसुत नागरिकांनी प्रचंड गर्दी केली. तर त्यांनी नागरिकांच्या अडचणी जाणून घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे प्रचारात त्यांनी एक खासदार काय असतो ? हे दाखवून देऊ अशी ग्वाही दिली. त्याची प्रचिती यावरून दिसून येत आहे. बीड जिल्ह्याचा खासदार म्हणून



निवडून आल्यानंतर बजरंग सोनवणे यांनी दुसऱ्या दिवशी पक्षाचे अध्यक्ष जाणते राजे खा. शरदचंद्र पवार यांची भेट घेतली. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ते मुंबई येथे गेले होते. त्यानंतर ते वरिष्ठांच्या आदेशानुसार मुंबई येथेच होते. सोमवारी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने अहिल्यानगर येथे आयोजित कार्यक्रमाला त्यांची मुख्य उपस्थिती होती. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपला फेटा बजरंग सोनवणे यांना घालत जायंट किलर असा उल्लेखही केला. तर बजरंग सोनवणे यांनी आपल्या भाषणात आपण आगामी विधानसभेसाठी मराठवाड्यात मोठी मोर्चेबांधणी करू व यश मिळवून देऊ असा विश्वास व्यक्त केला आठवडाभरानंतर खा. बजरंग सोनवणे हे केजमध्ये पोहचले. मंगळवारी सकाळपासूनच त्यांच्या पवनसुत या निवासस्थानी नागरिकांची प्रचंड गर्दी जमली होती. ऍक्शन मोडवर असलेल्या सोनवणेंनी आलेल्या नागरिकांनी अडचणी ऐकून घेत त्या सोडवण्यासाठी अनेक अधिकारी वर्गाना फोन करीत त्या समस्या सोडवण्याच्या सूचनाही केल्या. आपली अडचण समजून घेत प्रशासकीय अधिकाऱ्यांशी बाप्पानी संपर्क केल्यामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.

## वृक्षारोपण व ग्रंथ वाटून वाढदिवस साजरा....

**बीड/प्रतिनिधी**

डाक विभागाचे असिस्टंट पोस्ट मास्तर अमरसिंग ढाका व जि. प.माध्यमीक चे उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे यांचा संयुक्त जन्मदिवस 9 जुन रोजी रविवार होता व पोस्ट ऑफिस व जि.प. शिक्षण विभागात राजेश खटावकर अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी व अजय बहीर



अधीक्षक शिक्षण विभाग यांच्या हस्ते वृक्षारोपण व बाबासाहेब आंबेडकर लिखित जाती संस्थेचे उच्चाटन ॲनिहिलेशन ऑफ कास्ट व “देवळाचा धर्म आणि धर्मातली देवळे” प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे लिखीत हे दोन ग्रंथ वाटून साजरा करण्यात आला. त्यावेळी सोबत सामाजिक कार्यकर्ते मुसाखान, मिलिया स्कूल से प्राचार्य इरफ़ान सिद्दीकी व डाक विभागाचे पोस्ट मास्तर हेमंत वानखेडे,उप पोस्ट मास्तर विष्णू वीर अकाउंटंट बाबुराव धनवडे, अरूण पतंगे,बाबासाहेब जाधव, दत्तात्रेय गाडेकर, बाबासाहेब मोरे, किरण सावंत, अब्दुल जुनेद, तांबडे,उमेश शिंदे, उमेश बागलाणे, महादेव रसाळ,मनोहर भालशंकर इत्यादी कर्मचारी हजर होते.

## प्रभाग क्र. २४ मध्ये खराब रस्ते, तुंबलेल्या नाल्याची साफसफाई, दुरुस्ती करा -शुभम जोगदंड न.प.मुख्याधिकारी निता अंधारे यांना निवेदन

प्रभाग क्रमांक २४ मधील लोकांच्या समस्या पाहता रस्ते खराब व नाल्यातून दिला आहे त्यामुळे रहदारी करताना प्रभागातील लोकांना अडचण होत आहे काही लोकांची अपघात ही घडलेले पहावयास मिळत आहे. काही लोकांचे अपघातही या रस्त्यावर झालेले आहेत. या संदर्भात बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे निवेदन देऊन कामा तात्काळ करावे व दुरुस्ती करावी अशी मागणी करण्यात आली आहे. कामाचा आढावा घेण्यात आला यावेळी राष्ट्रवादी विध्यार्थी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शुभम जोगदंड, जिल्हा सचिव अमित डोंगरे,जिल्हा सरचिटणीस अलंकार सरवदे व आदी उपस्थित होते.



## सहा वर्षापासून अनुकंपा तत्वावर नोकरीस घेतले नाही सुनिता गित्ते व कुटुंबाचे दुसऱ्या दिवशी आमरण उपोषण सुरु

### उपोषणकर्त्या सुनिता गित्ते यांना गंभीर आजार तरी देखील समाज कल्याण प्रशासनाचे दुर्लक्ष

**बीड/प्रतिनिधी**

साने गुरुजी निवासी विद्यालय केज ता. जिल्हा बीड येथे कै. गोविंद ज्ञानोबा गीते ते सहशिक्षक पदावर कार्यरत होते, त्यांच्या निधनानंतर अनुकंपातत्वावर त्यांचा मुलगा श्रीनाथ गोविंद गीते यास नियमानुसार नोकरी मिळावी म्हणून सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन व वारंवार ‘पाठपुरावा करुनही आजतागायत नौकरी मिळत नसल्याने व मोठ्या आजाराने मुळे गित्ते कुंटूबावर उपासमारीची वेळ आली आहे. सुनिता गोविंद गीते व कुंटूबावर होत. होत असलेला अन्याय दुर व्हावा म्हणून वारंवार समाज कल्याण कार्यालयास व वरिष्ट कार्यालयास पत्र व्यवहार केला आहे. परंतु पत्रव्यवहाराची कोणतीही दखल न घेता सतत प्रस्तावात त्रुटी काढून नौकरी दिली जात नाही. मात्र इतरांच्या नियुक्त त्यांनी पैसे घेऊन केले आहे. व गीते कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. त्यामुळे मी दिनांक 27/05/2024 रोजी उपोषण करण्याची नोटीस दिली होती. तरी अद्यापपर्यंत बीड अनुकंप तत्वावरील नौकरीची ऑर्डर दिली नाही. त्यामुळे नाईलाजास्तव होत असलेल्या अन्याया विरुध्द दिनांक 10/06/2024 रोजी पासुन




समाज कल्याण कार्यालयासमोर सहकुंटूब आमरण उपोषणास बसले आहे. गीते कुटुंबीय उपोषणा करण्यापासून बीड समाज कल्याण विभागातील अधिकारी कर्मचारी दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून नियमबाह्य भरलेल्या जागेची तपासणी करण्यात यावी यामध्ये मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचेही उपोषणकर्त्यांचा आरोप आहे. उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे व अद्यापही समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी या उपोषणकर्त्यांची दखल घेतली नाही. उपोषणकर्ते या गंभीर आजारात असल्यामुळे त्यांच्या जीवाचं काय बर वाईट झालं तर याची परिणाम समाज कल्याण विभागातील अधिकाऱ्यांना भोगावे लागतील कुपोषणाचा आज दुसरा दिवस सुरू आहे.

## कविता

### पाऊस

ढग अंधारून आले
काळा घन बरसला
वारा वेगाने धावतो
थेंब टपोरा धावला

गारा आल्या सरसरा
ढेकळात विखुरल्या
तापलेल्या ढेखळात
कशा वितळून गेल्या

हिरव्यागार रानामध्ये
मयुर नृत्य मोहक
नृत्य करीते बिजली
ढग वाजवी ढोलकं

चिऊताई खोप्यामध्ये
बाळास देई ऊब
आईच्या मऊ स्पर्शात
तिचं सारं घर उभं

सरीवरी येती सरी
डबक्याचे झाले तळे
बेडकाचे डरावणे
एकवटूनिया बळे

स्वप्न डोळ्यात पाहतो
सुखावला बळीराजा
कृपा कर पांडुरंगा
बाप माझा भक्त तुझा

शीला पाटील. चांदवड.

# अखेर लिंबागणेश येथील मुळेवस्ती रस्तेकामास सुरुवात ....

## तब्बल ७५ वर्षांनंतर रस्त्याचा प्रश्न सुटला :- डॉ.गणेश ढवळे

**बीड/प्रतिनिधी**

लिंबागणेश :- स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागात दळणवळणाची साधने व्हावीत यासाठी मनरेगा तसेच मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत कोट्यवधींचा निधी शासनाकडून गावपातळीवर खर्च करण्यात आला.मात्र काही वस्ती यापासून वंचित असल्याने ग्रामस्थांना लोकसहभागातून रस्ते करण्याची वेळ आली आहे.अखेर यावर्षी मुलांच्या शालेय शिक्षण, दवाखाना, बाजारहाट तसेच खत बियाणे, भाजीपाला यांची पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून वाहतूक करावी लागत होती. यावर्षी मात्र लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, माजी उपसरपंच बाळकृष्ण मुळे,संदिप मुळे यांच्या पुढाकाराने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन रस्तेकामास सुरूवात झाली असुन तब्बल ७५ वर्षांनंतर मुळेवस्तीकरांना रस्ता मिळाला असुन अखेर रस्त्याचा पांग फिटला असं बोललं जाते.




वर्षभरापूर्वी रास्तारोको आंदोलन अखेर पावसाळ्यापूर्वी रस्ते कामास सुरुवात :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश येथील मुळेवस्ती या रस्त्याची दुरावस्था असुन ग्रामस्थांना पावसाळ्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो म्हणून रस्ता करण्यात यावा यासाठी ग्रामस्थांनी गेल्यावर्षी दि.०६ जुन २०२३ रोजी लिंबागणेश बसस्थानक येथे मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.यावेळी गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, शाखा अभियंता वाघ,स्थापत्य अभियंता अरविंद दुबाले, तहसिल प्रशासनाचे मंडळ अधिकारी वंजारे, तलाठी पोतदार, नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी विलास हजारे यांनी घटनास्थळी भेट देऊन रस्त्याची पाहणी करत पावसाळ्यापूर्वी रस्ता काम करण्याचे आश्वासन दिले होते.अखेर पावसाळ्यापुर्वी रस्तेकामास सुरूवात झाली असुन रस्त्याचा प्रश्न मिटला आहे.रास्ता रोको आंदोलनात माजी सरपंच कल्याण वाणी, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ,विक्रांत वाणी, श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे अभिजित गायकवाड, पांडुरंग वाणी, संजय घोलप, वैजनाथ भोसले, रामकिसन गिरे आदि ग्रामस्थ सहभागी होते.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# रुंद वरंबा सरी लागवड तंत्रज्ञान पिकासाठी नियोजनाबाबत मार्गदर्शन

**बीड/प्रतिनिधी**

बीड, दि. 11: खरीप हंगामातील आढळून येणारे पावसाचे दीर्घकालीन खंड किंवा अधिकच्या पावसामुळे साचून राहणारे पाणी यामुळे पिकांची वाढ आणि उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे पीक उत्पादनात घट येते. अशावेळी पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरवणे तसेच अधिक पावसात अतिरिक्त पाणी शेताबाहेर सुरक्षितपणे निचरा करणे, पीक वाढीसाठी अनुकूल गादी वाफे, रुंद वरंबा बी.बी एफ तयार करणे आणि त्यावर पिकांची लागवड करणे फायदेशीर ठरते. रुंद वरंबा सरी पद्धत (बीबीएफ) पिकांची जोमदार उगवण, एकाच वेळी वाफे तयार करणे, पेरणी करणे, खत देणे आणि विशेष म्हणजे कमी पाऊस किंवा अधिक पावसाच्या परिस्थितीमध्ये फायदेशीर ठरते.

रुंद वरंबा सरी पध्दती सोयाबीन पेरणी वरंब्यावर करण्यात येते. दोन्ही बाजूने सरी पाडण्यात येते व कमी पर्जन्यमान या स-यामध्ये पावसाचे पाणी साठवून जमीनीत मुरते त्यामुळे जमिनीत ओलावा अधिक काळ टिकून राहतो. तसेच पाउस जास्त पडला तर या स-यांमधून पाण्याचा निचरा होतो, आपण सोयाबीन पिकाचा विचार केला तर सोयाबिन पिकास पाण्याचा ताण बसला तर उत्पादनात घट दिसून येते. तसेच पाऊस जास्त झाला तर भारी जमिनीत पाणी साचून पिकांचे नुकसान होते. त्यामळे सोयाबीनसाठी रुंद वरंबा व सरी पध्दती जलसंधारण तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

बीबीएफ पध्दतीचे फायदे

पावसाचे पाणी स-यामध्ये मुरते त्यामुळे मूलस्थानी जल संवर्धन होऊन पावसाच्या दीर्घकालीन खंड काळात याचा लाभ होतो. या पद्धतीमुळे चांगली मशागत होऊन बियाणांसाठी चांगले वंरबे तयार होतात. गादी वाफे किंवा दरम्यान मध्ये हवा खेळती राहून पाणी व हवा यांचे योग्य प्रमाण राखले जाते. बियाण्यांची उगवण चांगली होते व पिकांची पुढील वाढ जोमदारपणे होते.अधिक पाऊस झाल्यास अधिकचे पाणी योग्य पद्धतीने निचरा होण्यास रुंद वंरबे सोबतच दोन्ही बाजूकडील सऱ्या मुळे मदत होते. बीबीएफ यंत्राच्या साह्याने आवश्यक रुंदीचे वंरबे दोन्ही बाजूने सऱ्यासह तयार करण. पेरणी करणे व खते देणे अशी विविध कामे एकाच वेळी करता येतात. मजुरांची तसेच ऊर्जेची जवळजवळ 40 ते 60 टक्के बचत होते. परिस्थितीनुसार सरासरी पाच ते सात हेक्टर क्षेत्र प्रतिदिन पेरणी करता येते. पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत सरासरी 20 ते 25 टक्के पर्यंत अधिक जलसंधारण आणि 20 ते 25 टक्के पर्याय उत्पादनात वाढ होते. आंतरमशागत करणे असे शक्य होते तसेच तन नियंत्रणाच्या दृष्टीने उगवण पूर्व तणनाशकांचा वापर केल्यास प्रभावी तणनियंत्रण होते. सोयाबीन तसेच कपाशी, तूर, हळद इत्यादी पिकांची लागवड या पद्धतीने करता येते.

बीबीएस यंत्राच्या साह्याने लागवड पद्धत

योग्य खोलीवर व प्रमाणामध्ये बियाणांची खतासह रुंद वंरबा सरी पद्धतीने विविध पिकांची पेरणी करण्यासाठी बी एफ यंत्र विकसित केले आहे. याशिवाय कपाशी, तूर, हळद, आले या पिकांची लागवड या पद्धतीने करता येते. रब्बी हंगामात भुईमुग व हरभरा लागवड या यंत्राने करता येते. बीबीएफ यंत्राच्या साह्याने पिकानुसार योग्य रुंदीचे व वंरबे तयार करून जास्त अंतरावरील पिकांच्या दोन ओळी तर कमी अंतरावरील पिकांच्या चार ओळी रुंद व वंरब्यावर येतील यानुसार नियोजन करून वरंब्यावर लागवड करता येते. सपाट वाफे पद्धतीच्या तुलनेत रुंद वरंबासरी पद्धतीमुळे सोयाबीन उगवण दोन दिवस अगोदर तसेच जोमदार झाल्याचे प्रयोगाने सिद्ध झाले आह. या यंत्राद्वारे रुंद वरंबा बनवणे, बियाणे पेरणी, खते देणे, रासनी करणे आणि उगवण पूर्व तणनाशकाची फवारणी करणे. अशी चार कामे एकाच वेळी होतात. यंत्रामुळे मजूर, वेळ आणि इंधनाची बचत होते. बियाणे, रासायनिक खते अशी निविष्ठामध्ये 20 टक्क्यापर्यंत बचत होते.याशिवाय दुसऱ्या टप्प्यात सऱ्या मोकळ्या करणे, कोळपणी करणे, कीटकनाशकांची फवारणी करणे अशी विविध कामे एकाच वेळी करता येतात.

# हुमनी किडीच्या नियंत्रणासाठी उपाय योजना

**प्रतिनिधी/बीड**

बीड, दि. 11: हुमणी किडी प्रामुख्याने जमिनीमध्ये राहून पिकाच्या मुळ्या खाऊन आर्थिक नुकसान करते. या किडीमुळे प्रामुख्याने ऊस, भुईमूग, ज्वारी, बाजरी व मका पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. या किडीचे लवकर नियंत्रण झाल्यास पिकाचे 30 ते 70 टक्के नुकसान होऊ शकते. म्हणूनच या किडीचा जीवनक्रम समजून एकात्मिक नियंत्रण करणे गरजेचे आहे. जेणेकरून पुढील नुकसान टाळता येईल.

हूमणी किडीची ओळख

प्रथम अवस्था पांढरीशुभ्र, पिवळे डोके, 7 मी.मी.लांबी, छातीवर पायांच्या तीन जोड्या, पूर्ण विकसित आळया पिवळट पांढऱ्या, डोक्याच्या रंग बदामी व अर्ध गोलाकार, अळीची लांबी सुमारे 35 ते 45 मि.मी.प्रौढ भुंगेरा तपकिरी किंवा बदामी रंगाचे व १७ ते २० मि.मी. लांब 8 मी.मी. पर्यंत जाड असतात. पंखाची प्रथम जोडी ढालीप्रमाणे मजबूत. पंखाची दुसरी जोडी पातळ व घडी करण्यासाठी लवचिक असून, पहिल्या जोडी खाली सुरक्षित व पंख उघडताना मदत करते.

प्रतिबंधात्मक उपाययोजना

मोसमी पावसाला सुरुवात होताच हूमणी भुंगे- यांचे प्रजनन होत असते. ते पुढे पिकासाठी घातक ठरत असतात. संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रजनन होऊ नये, यासाठी प्रकाश सापळे लावणे गरजेचे आहे. पावसाला सुरुवात होताच हुमणी नर-मादी भुंगेरे प्रजननासाठी सायंकाळी जमिनीतून बाहेर पडत असतात. एक मादी एकावेळी 50 ते 60 अंडी घालते. त्यातून हुमणीच्या अळया तयार होतात. याच अळ्या कोवळ्या पिकांचा नाश करीत असतात. हे टाळण्यासाठी प्रजननावरच नियंत्रण मिळवणे हा सोपा उपाय आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी लिंब, बाभळीच्या झाडाखाली अल्प खर्चात प्रकाश सापळा लावून भुंगेरे मारून टाकावेत एका प्रकाश सापळयात किमान 100 भुंगेरे अडकून पडून मरून जातात तर एका सापळ्यामुळे जवळपास 5000 हुमणी अळया नियंत्रणात आणता येतात.

एकात्मिक व्यवस्थापन

निंदणी आणि कोळपणीच्या वेळी शेतातील अळया वेचून नष्ट कराव्यात. जैविक नियंत्रणामध्ये परोपजीवी बुरशी मेटारायझियम ऐनिसोप्ली या उपयुक्त बुरशीचा 10 किलो प्रतिहेक्टर या प्रमाणात किलो जमिनीतून वापर करावा. फीप्रोनिल 0.3 टक्के दाणेदार 25 किलो - हेक्टर या प्रमाणात जमिनीत ओल असताना द्यावे. फीप्रोनिल 40 टक्के इमिडाक्लोप्रीड 40 टक्के हे संयुक्त कीटकनाशक 4 ग्राम/ 10 लिटर पाण्यातून मिसळून उसामध्ये आळवणी करावी. क्लोरीपायरीफॉस 20 टक्के प्रवाही 25 मिली/. दहा लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी. हूमणीच्या संपूर्णपणे व्यवस्थापन करण्यासाठी शेतकऱ्यांना सामुदायिक रित्या 2-3 वर्षे प्रौढ व अळया यांचे एकात्मिक व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. किमान एका गावात 10 शेतकऱ्यांनी दहा - दहा प्रकाश सापळे लावले, तर 50 हजार हुमणी अळया आपण नष्ट करू शकतात. हे भुंगरे 20 ते 25 जून पर्यंत दिसतील. पुन्हा त्यांची अंडी अवस्था व आळी अवस्था नियंत्रित करणे अत्यंत खर्चिक व अवघड होते. परिणामी उस, भुईमुग,ज्वारी, बाजरी व मका या पिकांवर मोठा प्रादुर्भाव होतो.हा सर्व संभाव्य धोका टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी गाफील न राहता प्रकाश सापळे लावून हूमणी नियंत्रण करावे. तसेच कृषी विद्यापीठाच्या शिफारशी प्रमाणे उपचाराचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

# परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्लीतील नागरी सुविधा सोडवण्यात याव्यात-बालासाहेब जगतकर

**परळी/ प्रतिनिधी**

परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील नागरी सुविधा सोडवण्यात याव्यात असे लेखी निवेदन वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्ध प्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी परळी नगरपालिकेस दिले असल्याची माहिती ही प्रसिद्धी पत्रकार द्वारे दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की गेल्या दोन महिन्यापासून परळी नगरपालिकेने पाईपलाईन केली असून त्यामुळे जगतकर गल्ली येथे मोठा खड्डा झाला असून येथे लहान मुलांना व महिलांना जाण्याने कठीण झाले असून यामुळे लहान मुले व महिला या खड्ड्यामध्ये पडत आहेत तसेच गेल्या अनेक दिवसापासून नवीन वस्ती झालेली शंकर साळवे ते सखाराम जगतकर कुमार जगतकर यांच्या घरापर्यंत नवीन पाईपलाईन टाकून पाण्याची व्यवस्था करण्यात यावी व याच लाईन वर एक वाल टाकून प्रबुद्ध नगर व नवीन वसाहतीस पाण्याची व्यवस्था करण्यात यावी तसेच भीम नगर येथील स्मशानभूमी त अर्धवट राहिलेले लाईटीचे काम पूर्ण करण्यात यावी या व इतर मागण्याची लेखी निवेदन परळी नगरपरिषद यांना दिले असून ते लवकरात लवकर करण्यात यावेत अन्यथा परळी नगरपालिकेवर वंचित बहुजन आघाडी च्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचेही लेखी निवेदनात म्हटले असल्याची माहिती ही वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी दिली आहे

## भद्रकाली परिसरामध्ये कोयता हातात धरून दहशत माजविणाऱ्याला पोलिसांनी केले जेरबंद .



शहर गुन्हे शाखेच्या युनिट एकचे आमदार मुक्तार शेख यांना संशयित असलम खान( 20 रा. फकीरवाडी दरबाज रोड भद्रकाली) हा गुमशा बाबा दर्गा परिसरात हातात कोयता घेऊन दहशत माजवत फिरत असल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक चेतन श्रीवंत ,सुरेश माळोदे, रमेश कोळी ,शरद सोनवणे ,आप्पा पनवळ, विलास चारोस्कर ,अमोल कोष्टी ,किरण शिरसाठ ,यांच्या पथकाने मोठ्या शिताफीने संशयित असलम यास अटक केली. त्याच्याकडून कोयता जप्त करण्यात आला आहे .याप्रकरणी भद्रकाली पोलिस ठाण्यात पुन्हा दाखल करण्यात आला असून संशयीतास ताब्यात घेण्यात आले आहे.

# आश्चर्यम.........ट्रान्सफॉर्मर जळाला आणि दोन तासातच नविन ट्रान्सफॉर्मर मिळाला ; उप अभियंता विजय हुलकुडे यांची कार्यतत्परता:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ग्रामीण किंवा शहरी भागातील रोहित्र नादुरुस्त किंवा जळाल्यापासुन ३ दिवसात दुरुस्ती करून मिळेल असे ऊर्जामंत्र्यांचे आदेश असुन त्यासाठी महावितरण कडून हेल्पलाईन सुरू केलेली असताना त्याचा फारसा समाधानकारक अनुभव नसताना आज मात्र लिंबागणेश येथील बसस्थानक येथील ट्रान्सफॉर्मर तपासाअंती जळाल्याचे स्थानिक महावितरण कर्मचाऱ्यांना कळाल्यानंतर डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी, पांडुरंग वाणी, बशीर शेख,अभय वनवे, कैलास गायकवाड यांनी उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश विजय हुलकुडे यांच्याशी संपर्क साल्यानंतर फक्त २ तासातच नविन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून देण्यात आला याबद्दल ग्रामस्थांनी हुलकुडे यांचे अभिनंदन केले.रात्री नविन रोहित्र बसविण्यासाठी कर्मचारी वैष्णव वैष्णव सुरवसे, युवराज सुरवसे आणि अंकुश गायकवाड यांचे कर्मचारी तुकाराम गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी मदत केली.



ट्रान्सफॉर्मर जळाला..३ दिवसात दुरुस्तीचे ऊर्जामंत्र्यांचे आदेश, हेल्पलाईन नंबर जारी ग्रामीण भागातील रोहित्र नादुरुस्त किंवा जळाल्यापासुन अनेक दिवस ग्रामस्थांना अंधारात रहावे लागते.हा प्रकार थांबविण्यासाठी महावितरणकडुन हेल्पलाईन क्रमांक ७८७५७६२००७ प्रसारित करण्यात आली आहे.ग्रामस्थांनी महावितरणच्या हेल्पलाईनला नादुरुस्त रोहित्राची माहिती स्थानिक मंडळ स्तरावरील कार्यकारी अभियंता व विभागाला द्यायची आहे. तसेच रोहित्राची माहिती देण्याबरोबरच व्हाट्सअप नंबरवर जळालेल्या ट्रान्सफॉर्मरचे फोटो आणि ठिकाणाचा तपशील पाठवायचा आहे.त्यानंतर ३ दिवसाच्या आत महावितरण कडून पर्यायी रोहित्र उपलब्ध करून देण्यात येईल असे विभागाकडून सांगण्यात येते. माहिती मिळाल्यानंतर ३ दिवसांच्या आत रोहित्राचे आईल उपलब्ध करणे,दुरूस्त रोहित्र उपलब्ध करणे,ईतर कामे करून या कालावधीत रोहित्र मिळेल अशी माहिती वितरणकडुन सांगण्यात येते. ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर अथवा बिघडल्यास तेथे लवकर दुरूस्त ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी ऊर्जामंत्र्यांनी महावितरणला निर्देश दिले आहेत.दिलेल्या निर्देशानुसार महावितरणने राज्यभर मोहीम सुरू केली आहे.कुठेही माहितीच्या अभावी गाव किंवा शहराचा परीसर अंधारात राहु नये यासाठी महावितरणकडून प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जाते.

## गुंगीचे औषध देऊन लूटमार करणाऱ्या लुटारूस अटक .

रेल्वे स्थानकामध्ये प्रवाश्या सोबत ओळख करून त्यांना गुंगेचे औषध देऊन त्यांची लुटमार करणाऱ्या चोरट्यास रेल्वे सुरक्षा बल व लोहमार्ग पोलिसांनी मोठ्या सीताफिने अटक केली आहे . बुद्धी सागर कुशियाल( वय २० रा. माळेगाव, सिन्नर )हा तरुण सतना ( मध्य प्रदेश ) येथे जाण्यासाठी नाशिकरोड रेल्वे स्थानक येथे तिकीट काढण्यासाठी आला होता. त्यावेळी छत्रपती संभाजी महाराज नगर येथील मेहबूब चांद शेख ( ४८ )याने त्याच्यासोबत मैत्री करीत चहा घेण्याचा आग्रह केला .चहा घेतल्यानंतर त्याने स्वतः जवळील गुंगीचे औषध टाकून आणलेले क्रीमचे बिस्कीट खाऊ घातले. व प्लॉट क्रमांक एकवर आणून बसवले, थोड्यावेळाने बुद्धीसागर यास गुंगी आल्यानंतर संशयित मेहबूब याने त्याच्याजवळ असलेले १५५० रुपये, पाकीट, आधार कार्ड, पॅन कार्ड ,व मोबाईल असे एकूण १९ हजार ५५० रुपये किमतीचा एवस लुटून पोबारा केला. बुद्धीसागर बेशुद्ध अवस्थेत आढळल्याने त्यास पोलिसांनी बिटको रुग्णालयात दाखल केले .त्याला शुद्ध आल्यावर त्याने अज्ञात व्यक्तीच्या विरोधात लोहमार्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली . त्यानंतर लोहमार्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश कुलकर्णी. रेल्वे सुरक्षा बलाचे निरीक्षक हरफुल सिंग यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक अहिरे , सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष उपाडे पाटील, दीपक निकम ,शैलेंद्र पाटील ,रेल्वे सुरक्षा बलाचे दिनेश यादव, मनीष कुमार, निर्मला सूर्यवंशी ,आदींनी गुप्त माहितीच्या आधारे संयुक्त कारवाई करीत चोरी केलेल्या रोख रक्कम व योगासह महबूब शेख यास अटक केली.




# बालमजुरी बंद करण्यासाठी आवाहन आज १२ जून रोजी बाल कामगार दिवस

**बीड/प्रतिनिधी**

बीड, दि. 11 : भारतीय राज्यघटनेनुसार शिक्षण आणि आरोग्य बालकांचे मुलभूत अधिकार आहेत. बालकांचे हे अधिकार अबाधित ठेवण्यासाठी बालमजुरी प्रथा कायम स्वरूपी नष्ट होणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने हे मान्य केले असून 14 वर्षाखालील मुलांना बालमजुरी करण्या प्रवृत्त करणाऱ्यांविरुद्ध जबर शिक्षेची तरतूद केली आहे.

त्याच अनुषंगाने केंद्र शासनाने बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, 1986 पारित केलेला आहे. अधिनियमानुसार 14 वर्षाखालील बालकांना कोणत्याही व्यवसाय/प्रक्रियेत कामावर ठेवणे तसेच 14 वर्ष पूर्ण परंतु 18 वर्ष पूर्ण न झालेल्या किशोरवयीन मुलांना धोकादायक उद्योग व प्रक्रियेमध्ये कामावर ठेवणे गुन्हा आहे. जर मालकाने / नियोत्त्याने बाल अथवा किशारवयीन मुलांना कामावर ठेवल्यास त्यांस 6महिने व 2 वर्षापर्यंत कारावास किंवा रु.20,000 (रुपये वीस हजार) ते रु.50,000/- (रुपये पन्नास हजार) पर्यत दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा होऊ शकते अशी तरतूद आहे.

बालमजुरी हि एक अनिष्ट प्रथा असून ती सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्यांशी निगडित असल्यामुळे या प्रथेविरुध्द विस्तृत प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक आहे. दरवर्षी 12 जून हा दिवस जागतिक बाल कामगार प्रथा विरोधी दिवस म्हणून देशभर पाळला जातो.

करिता बीड जिल्ह्यातील सर्व दुकाने / आस्थापना / हॉटेल / धाबे / गॅरेजेस / जूस सेंटर / रसवंती गृहे / बेकरी मालकांनी 14 वर्षाखालील बालकांना कोणत्याही व्यवसाय अथवा प्रक्रियेत तसेच 14 वर्ष पूर्ण परंतु 18 वर्ष पूर्ण न झालेल्या किशोरवयीन मुलांना धोकादायक उद्योग व प्रक्रियेमध्ये कामावर ठेऊ नये असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी यांनी केले आहे.

# मिटकरींचा दावा सोनवणेंनी धुडकावला; म्हणाले मी मरेपर्यंत शरद पवारांसोबत अजित पवारांना फोन केल्याचे मिटकरींचे होते टविट

**प्रतिनिधी/अंबाजोगाई**

बीड: बीडच्या बप्पाचा दादांना फोन असे टविट् अजित पवार गटाचे आ.अमोल मिटकरी यांनी केले होते. यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी हा दावा धुडकावत लावत आपण मरेपर्यंत शरद पवार यांच्यासोबत राहू, असे स्पष्ट शब्दात सांगून टाकले. अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांच्या दाव्याने राजकीय वर्तुळात बीडचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे अजित पवारांच्या संपर्कात आहेत का, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. 'बीडच्या बप्पाचा दादांना फोन' अशा आशयाचं ट्वीट आमदार अमोल मिटकरी यांनी केलं आहे. त्यामुळे शिवसेनेप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतही खासदार फुटीची भीती आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. मात्र, या प्रकरणावर बजरंग सोनवणे यांनी स्पष्टीकरण देत, मी मरेपर्यंत शरद पवार साहेबांसोबतच राहणार, असं स्पष्ट केलं आहे.अमोल मिटकरी यांनी ट्वीट केल्यानंतर बीडचे नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे माध्यमांशी बोलताना म्हणाले, अमोल मिटकरी यांनी लोकसभेमध्ये किमान एखादा खासदार निवडून आणायला हवा होता. त्यानंतर त्यांनी दुसऱ्याच्या



बाबतीत बोलावं की, बजरंग सोनवणे शरद पवार साहेबांना सोडून अजित पवार साहेबांच्या गटात येणार किंवा त्यांच्या संपर्कात राहून त्यांच्यात येणार, हे जे काही मिटकरींनी ट्वीट केलं आहे. मी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत आदरणीय शरदचंद्र पवार साहेबांसोबतच असणार आहे. असे संभ्रम निर्माण करण्याचे प्रकार अमोल मिटकरी यांनी बंद करावेत, त्यांनी आधी एखादा ग्रामपंचायतचा सदस्य निवडून आणावा, असा टोलाही लगावला.

काय म्हणाले सोनवणे...

'मी फोन करण्याचा संबंध कुठे येतो. ते असा संभ्रम का पसरवत आहेत, हे त्यांनाच विचारायला हवं. ते महाराष्ट्रातील जनतेला कनफ्युज का करत आहे. या राजकारणाच्या प्रक्रियेमध्ये वैयक्तिक विचार असतात, ते तुम्ही राजकारणात आणताय. हे मिटकरी अतिशय चुकीचं करत आहेत. मिटकरींना माझी विनंती आहे की, ते आमदार झालेत ते डायरेक्टली झालेत. आता त्यांना पक्षाने काय पद दिलंय, मला माहित नाही, त्यांनी एकदा जनतेतून निवडून यावं आणि त्यानंतर दुसऱ्यांच्या उष्टीला हात घालावा, ही माझी विनंती आहे. मी जिवंत असेपर्यंत मी शरद पवार साहेबांसोबतच राहणार', असं म्हणत बजरंग सोनवणे यांनी राजकीय वर्तुळातील चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

# पोलिस अधिकारी यांचेकरिता जनजागृती कार्यक्रम संपन्न

**प्रतिनिधी/बीड**

बीड, दि. 11 :महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार तसेच आनंद एल. यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या आदेशानुसार जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय, बीड येथे बाल कल्याण पोलिस अधिकारी तसेच विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठी विशेष पोलिस पथक यांच्यासाठी जनजागरण/ मार्गदर्शन पर कार्यक्रम दिनांक 11 जुन 2024 रोजी सकाळी 10.00 वाजता आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे अध्यक्षा श्रीमती.टी.ए.असरकर, अध्यक्षा बालन्यायमंडळ, बीड तथा 3 रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांनी भुषविले जी.जी. सोनी, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, तथा दिवाणी न्यायाधीश, व.स्तर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. श्रीमती.टी.ए.असरकर, अध्यक्षा बालन्यायमंडळ, बीड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पोलिस अधिकारी कर्मचारी यांनी सर्वप्रथम विधीसंघर्षग्रस्त बालकाच्या वयाची खात्री करणे आवश्यक आहे. त्यासाठी बालकाचा शाळा सोडल्याचा दाखला वगैरे कागदपत्राची पडताळणी करून वयाबाबात खातरजमा करावी जर जन्मतारखेबाबत कोणतेही कागदपत्र उपलब्ध नसतील तर बालन्यायमंडळाच्या परवानगी नुसार विधीसंघर्षग्रस्त बालकाची वैद्यकीय तपासणी करून वयाची खात्री करता येते.

तसेच इतर बाबतीत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी श्रीमती ए.एम.ढवळे, 1 ले अतिरिक्त सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर बीड. तसेच मा. श्रीमती. टी.एस. कोरहाळे, 2 रे अतिरिक्त सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर बीड. हया उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमासाठी बहुतांश पोलिस अधिकारी कर्मचारी प्रत्यक्ष व आभासी पद्धतीने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सचिन पांडकर अप्पर पोलिस अधिक्षक, बीड यांनी केले.

## भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या वतीने पुनंदगाव येथे वृक्षारोपणाचे आयोजन

माजलगाव तालुक्यातील पुनंदगाव याठिकाणी भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात येणार आहे 20 जून 2024 रोजी वृक्षारोपण करण्यात येणार आहे असे भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळंके यांनी पत्रकात म्हटले आहे भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या 26 वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन बीड जिल्ह्यात ठेवण्यात आलेले आहे तर माजलगाव मध्ये पुनंदगाव या ठिकाणी वृक्षारोपण करण्याचे ठरवले आहे असे पत्र काढण्यात आलेले आहे यावेळी तेथील उपसरपंच ग्रामसेवक आणि समितीचे तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थित वृक्षारोपण करण्याचे आयोजन केलेले आहे . भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या 26 व्या वर्धापन दिनानिमित्त समितीच्या वतीने वृक्षारोपण तालुक्यातील पुनंदगाव याठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. येथील उपसरपंच यांनी मोठा पुढाकार घेऊन आमच्या गावामध्ये सामाजिक कार्यक्रम राबवण्यात येतात व ते राबवली गेली पाहिजे असे म्हटले आहे गाव हे धरण परिसर असल्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षाची लागवड होण्यासाठी ग्रामपंचायत सदैव सामाजिक संघटनेच्या पाठीमागे राहील असे मत व्यक्त केले आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
बुधवार १२ जून २०२४
पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# चित्रपटानंतर आता मनोज जरांगे पाटील यांच्या नावाने शाळा, जय जगदंब शिक्षण संस्थेचे मुंगशी विद्यालयाला जरांगे पाटील यांचं नाव

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यावर चित्रपट येत आहे. संघर्ष योद्धा मनोज जरंगे पाटील आणि मर्द मावळा शिवरायांचा वाघ हे चित्रपट याच महिन्यात प्रदर्शित होत आहे. त्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांची संघर्षकथा मांडण्यात आली आहे. आता मनोज जरांगे यांचे नाव शाळांनाही देण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील शाळेला मनोज जरांगे पाटील यांच नाव देण्याचा ठराव मंजूर झाला आहे. बार्शी तालुक्यातील जय जगदंब शिक्षण संस्थेने मुंगशी विद्यालयाला जरांगे पाटील यांचं नाव देण्याचा ठराव करण्यात आला.

मनोज जरांगे पाटील यांना दिले पत्र

जय जगदंब शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अंतरवली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. त्यानंतर तुमचे नाव शाळेला देण्याची अनुमती मिळावी यासाठी पत्र दिले आहे. तसेच जरांगे पाटील यांना नामांकरण सोहळ्याचे सुद्धा निमंत्रण संस्थेनेकडून देण्यात आले आहे. याबाबत मनोज जरंगे पाटील यांच्याकडून शिक्षण संस्थेला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे मनोज जरांगे उपस्थित राहणार

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील हे स्वतः या नामकरण सोहळ्याला उपस्थित असणार असल्याचे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर कपिल कोरके सांगितला आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांच शाळेला नाव देण्याचा पहिला मान सोलापूर जिल्ह्याला भेटला आहे.बार्शी तालुक्यातील मुंगशी या गावामध्ये 1998 साली या विद्यालयाची स्थापना करण्यात आली होती.



## मनोज जरांगे यांनी घेतले औषधोपचार

पाटील यांनी अखेर उपोषणाचा बुधवारी पाचवा दिवस आहे. त्यापूर्वी चौथ्या दिवशी त्यांची प्रकृती खालवली होती. त्यामुळे त्यांनी औषधोपचार घ्यावे, यासाठी दोन वेळा डॉक्टरांचे पथक केले. परंतु त्यांनी औषध उपचार घेण्यास स्पष्ट नकार दिला. अखेर बुधवारी मध्यरात्री त्यांनी औषध उपचार घेतले. जरांगे पाटील यांनी सगळ्या सोयऱ्याची अंमलबजावणी करून कायद्यात रूपांतर करण्यासाठी उपोषण सुरु केले आहे. चार दिवस त्यांनी अन्न पाणी आणि औषधोपचार घेतला नव्हता. परंतु काल रात्री यांच्यावर वैद्यकीय पथकाच्या माध्यमातून औषध उपचाराला सुरुवात करण्यात आली. सलग उपोषण केल्यामुळे जरांगे पाटील यांची तब्येत खालावत असल्याने त्यांना औषध उपचाराची गरज होती.

# सोन्याने दामटले दरवाढीचे घोडे, चांदीने घेतली माघार, अशी आहे किंमत

**प्रतिनिधी**

गेल्या तीन दिवसांच्या उतरणीला सोन्याने ब्रेक दिला. सोन्याचा भाव वधारला. ग्राहकांच्या खिशावर त्यामुळे ताण येणार आहे. चांदीच्या किंमतीत मंगळवारी वाढ झाली होती. त्यात आता घसरण झाली आहे. चांदी स्वस्त झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या घसरणीमुळे चांदी 90 हजारांच्या खाली उतरली आहे. ग्राहकांना चांदीत गुंतवणूक करण्याची संधी आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला किंमतीत मोठा बदल दिसला नाही. आता सोने महागले तर चांदी स्वस्त झाली आहे. अशा आहेत मौल्यवान धातूच्या किंमती? गेल्या आठवड्यात सोने 1700 रुपयांनी महागले होते. 8 जून रोजी किंमती उतरल्यानंतर त्यात बदल झाला नव्हता. आता सोने वधारले आहे. त्यानंतर किंमतीत कोणताच बदल झाला नाही. 11 जून रोजी सोने 170 रुपयांनी वधारले. गुडरिटर्न्सनुसार, आता 22 कॅरेट सोने 66,000 रुपये प्रति 10 ग्रॅम तर 24 कॅरेट सोन्याचा भाव 71,990 रुपये प्रति 10 ग्रॅम आहे. चांदीत मोठी घसरणगेल्या आठवड्यात चांदीने 5500 रुपयांची उसळी घेतली. पण 8 जून रोजी चांदी 4500 रुपयांनी दणकन आपटली होती. त्यानंतर 10 जून रोजी चांदीत200 रुपयांनी वधारली. तर मंगळवारी 11 जून रोजी चांदी 1200 रुपयांनी घसरली. गुडरिटर्न्सनुसार, एक किलो चांदीचा भाव 90,500 रुपये आहे.14 ते 24 कॅरेटचा भाव कायइंडियन बुलियन्स अँड ज्वेलर्स असोसिएशननुसार (IBJA), सोने वधारले आणि चांदी घसरली. 24 कॅरेट सोने 71,445 रुपये, 23 कॅरेट 71,159 रुपये, 22 कॅरेट सोने 65,444 रुपये झाले. 18 कॅरेट 53,584 रुपये, 14 कॅरेट सोने 41,795 रुपये प्रति 10 ग्रॅमवर पोहचले. एक किलो चांदीचा भाव 87,708 रुपये झाला. वायदे बाजारात आणि आंतरराष्ट्रीय बाजारात सोने आणि चांदीवर कुठलाही कर, शुल्क नसते. तर सराफा बाजारात शुल्क आणि कराचा समावेश होत असल्याने भावात तफावत दिसून येते.किंमती मिस्ड कॉलवर

22 कॅरेट आणि 18 कॅरेट सोने खरेदी करण्यापूर्वी त्याच्या किंमती एका मिस्ड कॉलवर कळतील. तुम्ही 8955664433 या क्रमांकावर मिस्ड कॉल करु शकता. त्यानंतर तुमच्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस (SMS) येईल. त्याआधारे तुम्हाला किंमती कळतील. तसेच भाव जाणून घेण्यासाठी तुम्ही www.ibja.co वा ibjarates.com या ठिकाणी माहिती घेऊ शकता.

## ज्ञानराधाची माजलगाव शाखा केली सील !

माजलगाव ( लोकरंजन): ज्ञानराधा मल्टीस्टेट पतसंस्थेच्या गैरव्यवहारात दाखल झालेल्या माजलगाव येथील प्रकरणांमध्ये गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून केला जात आहे. ज्ञानराधा सुरेश कुटे आणि आशिष पतसंस्था कटे ग्रुप वरील प्राप्तिकर सुरू आहे. दरम्यान आर्थिक गुन्हे शाखेने सोमवारी माजलगाव येथील ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या मोंढा शाखेला दोन सरकारी पंचांच्या उपस्थितीत सील केले आहे. बीड शहरातील ज्ञानराधा . नऊ महिन्यापासून ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळत नाहीत. यामुळे ज्ञानराधा विरोधात जिल्ह्यात १४ गुन्हे दाखल झाले आहेत. पोलिसांनी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश कुटे आणि संचालक आशिष पाटोदकर यांना पुण्यातून अटक केलेली आहे. त्यांना १३ जून पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावलेली आहे. आर्थिक गुन्हे शाखा याप्रकरणी तपास करत आहे. सुरेश कुटे आणि आशिष पाटोदकर यांचे जबाब नोंदवले गेले आहेत तर सोमवारी पोलीस उपनिरीक्षक भारत बर्डे यांच्या पथकाने माजलगावातील मोंढा भागात असलेली ज्ञानराधा पतसंस्थेची शाखा सील केली आहे. या शाखेतील कागदपत्रे, संगणक, सॉफ्टवेअर सुरक्षित रहावे. यासाठी ही शाखा सील करण्यात आली आहे.

# लढेंगे.. जितेंगे, हम सब जरांगे! या गगनभेदी घोषणेचे निर्माते : ज्ञानदेव काशिद

गेल्या आठ महिन्यापासून महाराष्ट्रात संघर्षयोद्धा मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्या बुलंद नेतृत्वाखाली मराठा समाजाच्या न्याय हक्काचा लढा सुरू आहे. या लढ्यात असंख्य तरूण स्वतःला झोकून देऊन काम करताना दिसत आहेत. या असंख्य तरुणांपैकी एका तरूणाने आपल्या पहाडी आवाजाने महाराष्ट्राचे लक्ष वेधले त्या तरुणाचे नाव आहे... ज्ञानदेव काशिद! अंतरवाली सराटी येथे झालेल्या मराठ्यांच्या दीड कोटीच्या सभेत मनोजदादा जरांगे पाटील यांच्या अगोदर 'लढेंगे जितेंगे हम सब जरांगे' ही घोषणा देणारा आवाज ज्ञानदेव काशिद यांचा होता. बीड येथे झालेली पहाटेची सभा बापूसाहेब शिंदे, पंजाब येडे यांच्यासोबत ज्ञानदेव काशिद यांनी आपल्या प्रभावी सुत्रसंचलनाने यशस्वी करण्यात महत्त्वाचे योगदान दिले हे बीड जिल्हा कधीही विसरणार नाही. याच पहाटेच्या सभेत पहिल्यांदा 'लढेंगे जितेंगे... हम सब जरांगे' ही घोषणा पहिल्यांदा ज्ञानदेव काशिद यांच्या पहाडी आवाजात घुमली. मराठा आरक्षणाच्या चळवळीचं ब्रीदवाक्य ठरलेली 'लढेंगे जितेंगे, हम सब जरांगे!' ही घोषणा ज्ञानदेव काशिद यांच्या मुखातून पहिल्यांदा उमटली. ही घोषणा आज प्रत्येक मराठा समाजाच्या घरात, मनात कोरली गेली आहे. बीडची निर्णायक इशारा सभा त्यांनी आपल्या पहाडी आवाजातील सुत्रसंचालनाने गाजवली. अनेक सभेत मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या भाषणाअगोदर ज्ञानदेव काशिद यांचा आवाज घुमतो... तेव्हा मराठ्यांच्या हृदय गाभाऱ्यातून चैतन्याच्या लहरी बाहेर येतात. त्यांनी राजकीय सभेत मिळणारी नाणी बाजूला सारून समाजासाठी आपली वाणी चंदनाप्रमाणे झिजवली. ह्या वाणीचा सुगंध आज सर्वत्र दरवळतो आहे. संघर्षयोद्धा मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्यासाठी जीवाचे रान करणारा हा युवक कधी सभेत सुत्रसंचालन करताना दिसतो तर कधी स्वतःच्या मोबाईल कॅमेऱ्यातून मनोज दादांच्या सभा टिपताना दिसतो. मनोज दादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली जेव्हा लाखो लोक मुंबईच्या दिशेने निघाले होते... तेव्हा या विराट मोर्चाकडे मिडियाने थोडेसे दुर्लक्ष केले होते. त्यावेळी परभणीचा उदय भिसे आणि बीडचा ज्ञानदेव काशिद यांनी सोशल मीडियावर जी जादू केली ती अवघ्या महाराष्ट्राने पाहिली. 'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने शब्दांचीच शस्त्रे यत्न करू



शब्दची अमुच्या जीवाचे जीवन शब्दे वाटू धन जन लोका' या सतं तुकाराम महाराज यांच्या अभंगाला अनुसरून ज्ञानदेव काशिद यांचे व्यक्तिमत्त्व आहे. ते फर्डे वक्ते आहेत. संत साहित्याचे अभ्यासक आहेत. शिवचरित्रकार म्हणून त्यांनी शेकडो व्याख्याने दिलेली आहेत. ते उत्तम कीर्तनकार आहेत. सामाजिक प्रबोधनकार म्हणून त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, राजमाता अहिल्यादेवी होळकर, महाराणा प्रताप आदी महापुरुषांच्या जीवनावर त्यांनी व्याख्याने दिली आहेत. अचूक शब्दफेक आणि पहाडी आवाजाची किमया लाभलेले फर्डे वक्ते ज्ञानदेव काशिद ऊसतोड मजुर कौटुंबातून पुढे आलेले आहेत. महाविद्यालयीन जीवनात ते शेकडो वक्तृत्व स्पर्धांचे विजेते आहेत. महाराष्ट्रातील अनेक नामांकित व्याख्यानमाला यामध्ये त्यांनी व्याख्याने दिली आहेत. महाराष्ट्रातील अनेक मानाचे पुरस्कार त्यांच्या नावावर आहेत. ज्ञानदेव काशिद ऑफिशिअल या युट्युब चॅनलच्या माध्यमातून अनेक गडकिल्ले यावर त्यांनी उत्तम विडिओ बनवून महाराष्ट्राचा इतिहास पुढे आणला आहे. एम ए मराठी, सेट, नेट असं उच्च शिक्षण त्यांनी घेतलेलं आहे. सध्या ते संत तुकाराम महाराज यांच्या अभंगवाणीवर पीएचडी करत आहेत. उच्च विद्याविभूषित, उत्तम वक्ता अशी सर्वत्र ओळख असलेल्या या शेतकरी पुत्राने अतिशय कमी वयात प्रयत्नाच्या जोरावर आपला नावलौकिक निर्माण केला आहे. यश आणि प्रतिष्ठेच्या शिखरावर असूनदेखील यशाने हुरळून न जाता काम करणारा हा तरूण भविष्यात समाजासाठी काहीतरी चांगले निर्माण करील अशी खात्री वाटते. आपल्या सुस्वभावाने त्यांनी असंख्य माणसं जोडली आहेत. शब्दांचे भांडार आणि अमोघ वाणी लाभलेल्या ह्या तरूण वक्तृत्वपटूला उदंड आयुष्य आणि निरोगी आरोग्य लाभो. आजही ज्या खेड्यात एस टी बस पोहोचली नाही, अशा छोट्या गावातून ते पुढे आले आहेत. वक्तृत्वाला वाचन आणि अभ्यासाची जोड देऊन आपल्या कर्तृत्वाची छाप सोडणारे ज्ञानदेव काशिद यांचा तरूनाईने आदर्श घेतला पाहिजे. त्यांची सर्व स्वप्न साकार होऊन त्यांनी यशाची शिखरे काबीज करावित ह्याच त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा. येणाऱ्या प्रत्येक सुखदुःखात आम्ही तुमच्या सोबत आहोत. तुमच्या जीवनात आनंदाची बहार येवो ह्याच सदिच्छा!

**शुभेच्छुक:**
**सुशीलकुमार औटे**
**नायगाव( मयूर)**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com